**क्रमांक : ९१**

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## गुरुवार, दिनांक २९ ऑगस्ट, २०२४/ भाद्रपद ७, शके १९४६.

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**९१.** सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२३ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक १७ जुलै, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या व्दितीय सत्रात एकूण २३५ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. २३५ निवेदनांपैकी ९२ निवेदने सोमवार, दिनांक २८ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२१ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. प्रलंबित १४३ निवेदनांपैकी ४८ निवेदने गुरुवार, दिनांक २१ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२३ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. प्रलंबित ९५ निवेदनांपैकी ३० निवेदने गुरुवार, दिनांक २१ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १३३ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. एकूण ६५ निवेदनांपैकी ७ निवेदने सोमवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १३८ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. एकूण ५८ निवेदनांपैकी १३ निवेदने सोमवार, दिनांक १९ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ५ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. एकूण ४५ निवेदनांपैकी ०२ निवेदने सोमवार, दिनांक १३ मे, २०२४ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ३६ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. आता एकूण ४३ निवेदनांपैकी ०२ निवेदन शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : २९ ऑगस्ट, २०२४**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री.कैलास गोरंट्याल, श्री.राजेश टोपे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ९९१ पुढीलप्रमाणे आहे :-**

### विधानसभा लक्षवेधी सूचना क्रमांक-९९१

"मराठवाडयातील वाईदेशी कुणबी मराठा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या कुणबी मराठा समाजाला इतर मागासवर्गीय प्रवर्गात करण्याची मागणी माहे जुलै, २०२३ च्या तिसऱ्या आठवडयात करण्यात आलेली असणे, औरंगाबाद जिल्हा गॅझेट मध्ये तसे नमुद असणे, या समाजाची सामाजिक/आर्थिक क्षेत्र निहाय सर्वस्तरीय सव्हेक्षण पूर्ण होऊन त्याचा अहवाल सकारात्मक असल्याने राज्य मागासवर्गीय आयोगाच्या अध्यक्षांच्या निदर्शनास ही बाब आणुन देणे, राज्य मागासवर्गीय आयोगाने योग्य त्या शिफारशींसह आपला अहवाल राज्य शासनाकडे सादर केलेल असणे, संशोधन अधिकारी, राज्य मागासवर्गी आयोग याची प्रश्नावली भरुन समाधानकारक उत्तरासह जालना-औरंगाबाद, बीड या जिल्हयातील समाज कल्याण अधिकारी यांनी याबाबतची शिफारस राज्य मागासवर्गीय आयोगाकडे केल्यानंतर न्या.गाकवाड आयोग, न्या.आनंद निरमुडे आयोग, मा.नारायण राज समिती यांचेकडे समाजाने वेळोवेळी वाईंदेशी कुणबी समाजास इतर मागासवर्ग प्रवर्गात सामावेश करण्याची मागणी करणे, राज्य मागासवर्ग आयोगाने, जालना जिल्हयातील जालना, जाफ्राबाद, परतुर घनसांवगी इत्यादी तालुक्यातील गावांगावात जातसमुहाशी चर्चा व क्षेत्र पाहणी करुनही अद्यापपावतो याबाबत ठोस निर्णय झालेला नसणे, त्यामुळे मराठवाडयातील वाईंदेशी कुणबी समाजातील नागरिकांमध्ये नाराजी व शासनाविरुध्द पसरलेली असंतोष यावर शासनाने निर्णय घेण्याबाबत करावयाची कारवाईची आवश्यकता व या संबधी शासनाची भुमिका."

---

### मा.मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण यांनी करावयाचे निवेदन:-

मराठवाड्यातीलं वायंदेशी कुणबी मराठा या समाजास इतर मागास वर्गामध्ये समावेश करण्याबाबत दि.१७/५/२०२२ रोजी महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगास निवेदन प्राप्त झाले होते. त्यामध्ये औरंगाबाद जिल्हा गॅझेट मधील वायंदेशी कुणबी बाबतचा उल्लेख असल्याबाबतची प्रत सादर केली आहे. सदर प्रकरण पूढील कार्यवाहीसाठी आयोगाच्या औरंगाबाद उपसमितीकडे सोपविण्यात आले आहे. उपसमितीने सदर प्रकरणात दिनांक ५ जून, २०२३ रोजी जालना, घनसावंगी, परतूर, जाफ्राबाद, औरंगाबाद या ठिकाणी क्षेत्रपहाणी व जात समुहाशी चर्चा केलेली आहे. सदर दौऱ्या दरम्यान वायंदेशी कुणबी मराठा संघटनांनी त्यांच्या मागण्याबाबत उपसमितीकडे निवेदने सादर केली आहेत. शासकीय यंत्रणेमार्फत सदर समाजाच्या मुलाखत अनुसूची भरुन घेण्यात येत आहेत.

यापूर्वी सन २००० मध्ये अहवाल क्रमांक-८ अन्वये, वायंदेशी मराठा समाजाच्या मागणीच्या अनुषंगाने वायंदेशी मराठा या जातीच्या नावामध्ये कुणबी असा उल्लेख कोठेही येत नसल्याने त्यांना कुणब्यांच्या तत्सम समजणे योग्य ठरणार नाही, म्हणून वायंदेशी कुणबी या जाती समूहाचा स्वतंत्रपणे इतर मागास वर्गाच्या यादीमध्ये समावेश करणे योग्य होणार नसल्याचे अहवाल शासनास महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाकडून सादर करण्यात आलेले आहेत. तसेच तत्कालीन मा.अध्यक्ष न्यायमुर्ती श्री.गायकवाड यांच्या कार्यकाळामध्ये दि.७/९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये वायंदेशी मराठा समाजाचा मराठा कुणबी म्हणून इतर मागासवर्गाच्या यादीत समावेश करण्याबाबतच्या

मागणीच्या अनुषंगाने मराठवाड्यातील कुणबी मराठा समाजाचा इतर मागासवर्गामध्ये समावेश करण्याबाबत अहवाल क्रमांक-८ अन्वये शासनास महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाकडून सादर करण्यात आलेला आहे.

सद्य:स्थितीत इतर मागासवर्ग यादीतील अ.क्र.८३ येथे कुणबी, पोटजाती-लेवा-कुणबी, लेवा पाटील, लेवा पाटीदार, मराठा कुणबी व कुणबी मराठा या जाती समाविष्ट आहेत. वायंदेशी कुणबी मराठा ही जात मागासवर्गामध्ये समाविष्ट नाही.

विद्यमान आयोगाकडे दिनांक १७/५/२०२१ रोजीच्या व त्यानंतरच्या निवेदनांद्वारे मराठवाड्यातील वायंदेशी कुणबी मराठा या जातीस इतर मागास प्रवर्गात समावेश करण्याबाबतची निवेदने प्राप्त झालेली असून, त्यावर महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाकडे कार्यवाही सुरु आहे. सदर प्रकरणी औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) उपसमितीकडून अभ्यासाअंती आयोगास अहवाल सादर झाल्यानंतर शासनास त्याबाबतचा अंतीम अहवाल प्राप्त होणार आहे.

*************

H-0073-1A

गृह विभाग                                                    लक्षवेधी सूचना क्र. १८५७

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन**

**मा. श्री. अतुल भातखळकर विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

" पुण्यात अटक केलेल्या दोन दहशतवाद्यांच्या घरातून ड्रोन व बॉम्ब तयार करण्याचे साहित्य, गुगल वरून घेतलेली कुलाबा येथील छाबडा हाऊस सह इतर संवेदनशील स्थळांची मोबाईल मधील छायाचित्रे आणि लॅपटॉप मधून पाचशे जीबी डेटा हस्तगत करण्यात आला असल्याची धक्कादायक बाब माहे जुलै, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, तसेच हे दहशतवादी आपली नावे लपवून बनावट कागदपत्रांच्या आधारे आपली ओळख लपवत व बनावट नाव धारण करून पुण्यात रहात असणे, त्यामध्ये, या दहशतवाद्यांनी कोल्हापूरच्या जंगलात बॉम्बस्फोटाचे प्रशिक्षण आणि चाचणी केल्याची गंभीर बाब ही निदर्शनास आली असणे, त्यामध्ये, एका दहशतवादीला रत्नागिरी येथून अटक करण्यात आली असणे, त्यामुळे, राज्यभरात किती ठिकाणी हे जाळे पसरले आहे याची सखोल चौकशी करण्याची गरज असणे, त्यामुळे, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

*******************************************************************

**मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन**

दिनांक १८/०७/२०२३ रोजी फैजाने मस्जिद जवळ, मिठानगर, कोंढवा पुणे येथे सदर प्रकरणातील संशयीत १) मोहम्मद इम्रान मोहम्मद युसुफ खान २) मोहम्मद युनुस मोहम्मद याकुब साकी, ३) मोहम्मद शाहनवाज शफीउररहमान आलम हे दिनांक ११/०७/२०२३ ते दिनांक २४/०७/२०२३ रोजी पर्यंत प्रतिबंधात्मक बंदी आदेश लागू असतानाही अग्निशस्त्र ठेवण्याचे पाऊचसह जिवत काडतूस ताब्यात बाळगून, फसवणूक करण्याचे उद्देशाने बनावट आधारकार्ड बनवून तसेच अप्रामाणिकपणे त्रयस्थ व्यक्तीचे दुचाकी वाहन चोरून नेण्याचा प्रयत्न करीत असताना पोलीसांना मिळून आले. त्यानुसार सदर आरोपीविरूद्ध कोथरूड पो.स्टे. पुणे शहर येथे भारतीय दंड संहिता कलम ४६८,३७९,५११,३४, सह भारतीय हत्यार कायदा कलम ३ (२५), ४(२५), सह कलम ३७(१)(३)/१३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरचा गुन्हा पुढील तपासाकरीता दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे वर्ग करण्यात आला. सदर गुन्हयाच्या तपासात दि. २२/०८/२०२३ रोजी आरोपीने दिलेल्या बयानाप्रमाणे सर्व्हे नं. ४२, ब्राईट फ्युचर स्कुलच्या समोरील गल्लीत, सवा हाईट्सच्या समोर, १०१ पहीला मजला, मिठानगर कोंढवा खुर्द, पुणे येथून ड्रोन व अॅल्युमिनियम पावडर व इतर इलेक्ट्रीक साहित्य काढून दिल्याने जप्त करण्यात आले आहे. तसेच आरोपींच्या ताब्यातुन इलेक्ट्रॉनिक्स डिव्हायसेस जसे की, मोबाईल फोन, लॅपटॉप, हार्डडिस्क, पेनड्राईव्ह, डोंगल असे साहीत्य जप्त करण्यात आलेले आहे. त्यामधील पेनड्राईव्ह मधील डेटाची तपासणी करण्यात आली असुन त्यामध्ये आक्षेपार्ह लिखाण, फोटो डॉक्युमेन्टस् इत्यादी मिळून आले आहे.

E गृ.भा.सं.

शेटा H/78 (750-6-24)

आरोपी मोहम्मद शाहनवाज शफीउररहमान आलम याने आरोपी मोहम्मद इम्रान मोहम्मद युसुफ खान आणि मोहम्मद युनुस मोहम्मद याकुब साकी याच्या बनावट नावांची आधार कार्ड बनवून दिली होती. सदर बनावट आधार कार्ड इत्यादी जप्त करण्यात आले आहे.

आरोपी मोहम्मद इम्रान मोहम्मद युसुफ खान याने दिलेल्या बयानाप्रमाणे दाखविलेल्या जागी जमीनीत पुरून ठेवलेले बॉम्ब बनविण्याचे साहित्य ज्यामध्ये केमीकल्स, केमीकल पावडर, लॅब इक्युपमेन्टस् त्यामध्ये थर्मामिटर, पिपेट असे साहित्य जप्त करण्यात आले आहे. तसेच आरोपी सीमाब नसिरुद्दीन काझी याचा गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास दि. २८/०८/२०२३ वाजता अटक करण्यात आले आहे. तसेच आरोपी झुल्फीकार अली बडोदावाला याला दि. ०१/०८/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाची व्याप्ती ही विविध राज्यांमध्ये पसरलेली असल्याने सदरचा गुन्हा गृह मंत्रालय, दिल्ली यांच्या आदेशान्वये पुढील तपासकामी एन. आय. ए. कडे वर्ग केलेला आहे.

-----****------